ARTHA (Commercial Weekly) Poona 4.

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

“अर्थ एव प्रधानः” इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : १२ नये पैसे
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष १५ पुणें, बुधवार तारीख ३० सप्टेंबर, १९५९ अंक ३९

## विविध माहिती

**पाकिस्तानांत विमानानें टपाल**—पाकिस्तान सरकारनें ज्या शहरांना विमानाची ये–जा होऊं शकते त्या शहरांना विमानानें टपाल पाठविण्याची सोय करण्याचें ठरविलें आहे. ह्या योजनेमुळें पाकिस्तानच्या सरकारला टपालाच्या हल्लींच्या खर्चापेक्षा दरसाल १० लाख रुपये अधिक खर्च करावे लागतील. सरकारनें कांहीं पत्रांना लागणाऱ्या टपाल हशीलांत वाढ केली आहे.

**मध्यप्रदेशांतील खनिजें**—मध्यप्रदेशांतील खनिज संपत्तीचा विकास करण्यासाठी तिसऱ्या पंचवार्षिक योजनेंत एका कॉर्पोरेशनची स्थापना करण्याचें राज्य सरकारनें ठरविलें आहे. राज्याचें उत्पन्न वाढविण्याच्या दृष्टीनें आणि अधिक रोजगारी उत्पन्न करण्याच्या दृष्टीनें सरकारला असें करणें आवश्यक वाटूं लागलें आहे.

**छोट्या धंद्यांचें फेडरेशन**—भारतामधील छोट्या धंद्यांच्या संघटनांचें एक फेडरेशन स्थापन करण्यांत येणार आहे. सध्या भारतांत छोट्या धंद्यांची ९० असोसिएशन्स आहेत. छोट्या धंद्यांचा विकास करण्याच्या दृष्टीनें शक्य तें सर्व कार्य फेडरेशनमार्फत केलें जाणार आहे. त्याशिवाय तांत्रिक व कारभारविषयक सल्लाहि दिला जाईल.

**भाक्रा धरणाची दुरुस्ती**—भाक्रा धरणावर झालेल्या अपघातांत झालेली मोडतोड दुरुस्त करण्यासाठी मि. स्लोकम् हे मुख्य अमेरिकन एंजिनिअर अमेरिकेला जात आहेत. दुरुस्ती करण्यासाठी लागणारी यंत्रसामुग्री व जरूर ते तज्ज्ञ ह्यांची अमेरिकेंतून आयात करण्याचें काम ते करतील. भाक्रा धरण–योजनेच्या अधिकाऱ्यांनींच त्यांना पाठविलें आहे.

**सुरतमधील आपद्ग्रस्तांना मदत**—सुरत व त्याच्या आसपासच्या टापूंत तापी नदीला आलेल्या पुरानें हजारों लोक निराश्रित झाले. निराश्रितांना मदत करण्यासाठी मुंबई सरकारनें १२ लाख रुपये मंजूर केले आहेत. त्यांपैकी २ लाखांच्या देणग्या देण्यांत येतील. ५ लाख रुपये तगाई कर्जें व घरें बांधण्यासाठी मिळतील व ५ लाख रुपये बीं–बियाणें व अन्नधान्य घेण्यासाठी कर्जाऊ देण्यांत येतील.

**दुबार कर घेऊं नका**—भारताच्या एखाद्या नागरिकाची भारतांत व परदेशांत मालमत्ता असेल तर त्याला संपत्तिकर दुबार भरावा लागतो. संपत्तिकराची आकारणी करतांना परदेशांतील त्याची मालमत्ता जमेस धरली जाते. त्या देशांत जर संपत्तिकर असेल तर तोहि त्याला भरावा लागतो. ह्या बाबतींत सवलतीचें धोरण स्वीकारावें अशी विनंती फेडरेशन ऑफ इंडिअन चेंबर्सनें सरकारला केली आहे.

**इराक–रशिआ सागरी वाहतूक**—इराक व रशिआ ह्या दोन देशांच्या दरम्यान अलीकडे व्यापाराची वृद्धि झालेली आहे. त्यामुळें उभयतां देशांतील सागरी वाहतुक अधिक नियमित करणें आवश्यक झालें आहे. ही गरज लक्षांत घेऊन रशिआनें काळ्या समुद्रावरील आपलीं बंदरें व इराकमधील बसरा बंदर ह्यांच्यांतें कायम वाहतुकीची सोय केली आहे.

**रशिआच्या सूचना स्वीकारा**—रशिआचे पंतप्रधान मि. क्रुश्चॉव्ह ह्यांनीं शस्त्रास्त्रांवर निर्बंध घालण्याच्या दृष्टीनें ज्या सूचना नुकत्याच केल्या आहेत, त्यांचा काळजीपूर्वक विचार करण्यांत आला पाहिजे असें मत ब्रिटनमधील विरोधी पक्षाचे पुढारी मि. ह्यू गेट्स्केल ह्यांनीं व्यक्त केलें आहे. शस्त्रास्त्रांच्या उत्पादनांत अंदाजें १० कोटी माणसें गुंतलीं आहेत, असें मि. क्रुश्चॉव्ह ह्यांनीं सांगितलें आहे.

**आंध्रमधील नवे कारखाने**—मध्यवर्ती सरकारनें दिलेल्या परवान्यांप्रमाणें आंध्र प्रदेशांत चार नवे कारखाने काढण्यांत येणार आहेत. त्यांपैकीं एक कारखाना सल्फ्यूरिक ॲसिडचा व दुसरा सुपर–फॉस्फेटचा आहे. सर्व कारखान्यांना मिळून २ कोटी रुपये भांडवल लागणार आहे. त्यापैकी १ कोटी रुपये परदेशीय चलनाच्या रूपांत लागतील.

**अन्नमंत्री परदेशीं जाणार**—संयुक्त राष्ट्र संघटनेच्या अन्न व शेतकी उपसंघटनेची परिषद येत्या नोव्हेंबरमध्यें रोम येथें भरणार आहे. ह्या परिषदेला भारतातर्फे अन्नमंत्री श्री. एस. के. पाटील हजर राहणार आहेत. त्यानंतर युरोपांतील कांहीं देशांतील अन्नधान्याच्या प्रश्नाची माहिती घेऊन ते अमेरिकेला जातील. भारतासाठी अधिक धान्य मिळविण्याचा ते प्रयत्न करतील.

**रत्नागिरी येथें मँगेनीजचा कारखाना ?**—मँगेनीजच्या खनिजावर संस्करण करून त्याची अमेरिकेला निर्यात करण्यासाठी रत्नागिरी अगर कारवार येथें एक कारखाना काढण्यांत येणार आहे. कारखाना १९६१ सालापूर्वी उभारला जाईल असा अंदाज आहे. त्यासाठी ५० लाख रुपये भांडवल लागेल.

**नाविक दलाचें साह्य**—भाक्रा–नांगल धरणावर झालेल्या अपघातांत विजेच्या निर्मितीच्या केंद्रांत पाणी शिरल्यामुळें बरेंच यंत्रसाहित्य अडकून पडलें आहे. त्यापैकी शक्य असेल तीं यंत्रसामुग्री वांचविण्यासाठी भारताच्या नाविक दलांतील सहा कुशल पाणबुड्यांचें साह्य घेण्यांत आलें आहे. पाणबुड्यांच्या कामांत त्यांच्या संरक्षणाची खास व्यवस्था करण्यांत आली आहे.

**उसाच्या किमान किंमतीची शिफारस**—बिहार-उत्तर प्रदेश राज्यांच्या संयुक्त-ऊस बोर्डानें १९६०-६१ सालच्या हंगामांत उसाची दरमणी किमान किंमत रु. १-१२ आणे असावी अशी शिफारस केली आहे. १९५९-६० सालच्या हंगामासाठी भारत सरकारनें ठरविलेली दरमणी १ रु. ७ आणे किंमत बोर्डाला अपुरी वाटत आहे.

**भूतानमधील रस्त्यांचा खर्च**—भारत सरकारनें भूतानमध्यें सर्व हवामानांत उपयोगी पडतील असे रस्ते बांधण्याच्या कामीं तांत्रिक व आर्थिक मदत देण्याचें ठरविलें आहे. रस्तेबांधणीच्या कामाच्या संपूर्ण योजनेला १५ कोटी रुपये खर्च येणार आहे. हा सर्व खर्च भारत करणार आहे. मात्र खर्चाची रक्कम अनेक वर्षांवर वांटण्यांत येणार आहे.

**खाणी एंजिनिअर्सना शिक्षण**—नॅशनल कोल डेव्हलपमेंट कॉर्पोरेशननें खाणीमधील कामाचें शिक्षण देण्यासाठीं ४०० एंजिनिअर्सना व अधिकाऱ्यांना परदेशीं पाठविण्याचें ठरविलें आहे. आतांपर्यंत १५ अधिकाऱ्यांना परदेशांत शिक्षण देण्यांत आलें आहे. त्यांपैकी १३ अधिकारी ब्रिटनमध्यें गेले होते व प्रत्येकी एक अमेरिका व पश्चिम जर्मनींत गेला होता.

**अहमदाबाद-कांडला रेल्वेमार्ग**—कांडला ते अहमदाबाद असा रुंद रुळाचा रेल्वेमार्ग बांधण्याचें काम आतां त्वरित हातीं घेण्यांत येण्याचा संभव आहे. प्रथम हा मार्ग १९६६ मध्यें पूर्ण करण्यांत यावयाचा होता. पण, मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र झाल्यास अहमदाबाद शहराला बंदरापर्यंत जाणारा रेल्वेमार्ग राहणार नाहीं. म्हणून ही त्वरा करण्यांत येत असल्याचें समजतें.

**सरकारी नोकरांना संपाला बंदी**—सरकारी नोकरांनीं अंशतः अगर संपूर्णपणें संपावर जाणें बेकायदा ठरविणारें बिल मध्यप्रदेश सरकार विधिमंडळांत आणणार आहे. नोकरीबाबतचे नियम नोकरांच्या व्यक्तिशः वागणुकीला लागू पडणार असले तरी नोकरांनीं मोठ्या प्रमाणावर व एकजुटीनें संप केल्यास त्या परिस्थितीला तोंड देण्यास ते अपुरे आहेत, असें सरकारचें म्हणणें आहे.

**कौलांचा सहकारी कारखाना**—म्हैसूर राज्यांत होनावर येथें मंगलोरी कौलें तयार करण्याचा एक सहकारी कारखाना स्थापन करण्यांत आला आहे. कारखान्यासाठी ३ रु. लाख भांडवल लागलें आहे. त्यांत दरसाल २६ लाख कौलें तयार होतील असा अंदाज आहे. कारखान्याच्या उभारणीसाठी मध्यवर्ती व राज्य सरकार ह्यांनीं साह्य केलें आहे.

**शालेय पुस्तकांवरील विक्रीकर**— शाळा-कॉलेजांतील विद्यार्थी जीं क्रमिक पुस्तकें व नियतकालिकें घेतील त्यावर विक्रीकर न घेण्याचा निर्णय आसामच्या सरकारनें घेतला आहे. त्याशिवाय, विद्यार्थी घेत असलेल्या स्टेशनरीच्या सामानावरहि हा कर घेतला जाणार नाहीं. राज्यांतील संस्कृतच्या शिक्षणाच्या सोयींत सुधारणा करण्यांत येणार आहेत.

**अहमदाबादजवळ नवी राजधानी**—मुंबई राज्याची विभागणी करून वेगळा महागुजरात बनविण्यांत आल्यास त्याची राजधानी अहमदाबादपासून १० मैलांवर नव्यानें वसविण्यांत येण्याची शक्यता आहे. नवी राजधानी तयार होईपर्यंत गुजरात राज्याच्या कचेऱ्या साबरमती आश्रमांत अगर साबरमती तुरुंगाच्या इमारतींत राहण्याचा संभव आहे.


दातांच्या स्वच्छतेसाठी
★ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ★

माधवाश्रम लि. भोजनाची व राहण्याची उत्कृष्ट सोय.
विवाहकार्याची संपूर्ण व्यवस्था. गिरगांव, मुंबई ४.

कण आणि क्षण
( सुखी जीवनाच्या पाऊलवाटा )
लेखक:—श्री. वा. काळे, संपादक, "अर्थ"
मराठी दुसरी आवृत्ति ] [ किं. ९ रु. ८ आ.

अन्नाचें रहस्य


बेडेकर मसाले, लोणचीं, पापड ह्या वस्तूंनीं आपल्या जेवणांत गोडी वाढते व समाधान वाटतें.
★ व्ही. पी. बेडेकर आणि सन्स लि. ★
दुकानें—मुगभाट, ठाकुरद्वार, दादर, कोट, परळ
— द. ना. हेजीब, ३० शुक्रवार पेठ, पुणें —

सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक लि.
स्थापना १९१८ | सारस्वत बँक गृह, गिरगांव मुंबई ४. | टेलिफोन २७०१८.
भारतांतील सर्व केंद्रांतून व्यापारी लोकांच्या हुंड्या व रेल्वे रिसिट यांची वसुली माफक दरानें केली जाते.
विशेष माहिती मुख्य कार्यालय किंवा कोणत्याही शाखेत मिळेल.
शाखा: फोर्ट · दादर · माहिम · परळ · पुणें · ...
महिला शाखा: सारस्वत बँक गृह, गिरगांव मुंबई ४.

# अर्थ

बुधवार, ता. ३० सप्टेंबर, १९५९



संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे

संपादक :
श्रीपाद वामन काळे


## अमेरिकन मदतीनें अमेरिकन मालच घ्या

### गरजू देशांवर नवी अट!

अमेरिका सध्यां परदेशांना जीं कर्जे देते, त्या कर्जांच्या पैशांतून इतर देशांना जगांत कोठेंहि माल खरिदतां येतो. अमेरिकन यंत्रसामग्री व इतर भांडवली माल महाग असल्यानें अमेरिकेपेक्षा इतर देशांतूनच अशा मालाची आयात करणें भारताला सोईस्कर व फायदेशीर पडतें. अमेरिकन मदत व कर्जे ह्यांचा उपयोग अमेरिकन मालाच्या खरेदीसाठीच केला पाहिजे, अशी अट घालण्याचा अमेरिकन सरकार विचार करीत आहे. त्यामुळें गरजू देशांच्या प्रतिनिधींमध्यें खळबळ उडाली आहे. डेव्हलपमेंट लोन फंडाच्या कर्जांसहि ही नवी जाचक अट लागू पडणार आहे; सध्यां फक्त एक्सपोर्ट-इंपोर्ट बँकेच्या कर्जांसच ती लागू आहे. अमेरिकन मदत व कर्जे ह्यामुळें बाहेर जाणारा पैसा आणि आयातीसाठी खर्चावा लागणारा पैसा ह्यांची भरपाई निर्गतीच्या कमाईतून होत नसल्या-कारणानें अमेरिकेच्या परराष्ट्रीय येण्या-देण्याच्या ताळेबंदांत तूट पडून अमेरिकन सोनें मोठ्या प्रमाणावर बाहेर जाऊं लागलें आहे; अमेरिकन डॉलर्सच्या स्वरूपांत असलेल्या परदेशी सरकारांच्या शिलकांचें सोन्यांत रूपांतर होत आहे. सोन्याची निर्गत अशीच चालू राहिली, तर डॉलरची किंमत उतरेल आणि त्यामुळें परदेशीयांच्या डॉलरमधील शिलकांचें सोन्यांत रूपांतर होण्यास आणखीच चालना मिळेल आणि अमेरिकन चलनाचा सोन्याचा आधार मर्यादेखाली जाऊं लागेल. ह्या संभाव्य अडचणींना आळा घालण्याचा एक उपाय म्हणजे अमेरिकन मदत व कर्जे हीं अमेरिकन मालाच्या खरेदी-साठीच, अमेरिकेंतच खर्चायला लावणें, हा आहे. मदत व कर्जे घेणाऱ्या देशांना त्यामुळें तेवढ्याच रकमेंत सध्या-पेक्षा कमी माल मिळेल. कारण, अमेरिकन मालाच्या किंमती जास्त आहेत. त्यांची परदेशी हुंडणावळीची परिस्थिति अधिकच बिघडेल; कारण नियोजित खरेदीसाठी जास्त परदेशी हुंडणावळ लागेल. अमेरिकन सरकारच्या नव्या धोरणाचा भारताच्या आर्थिक परिस्थितीवर परिणाम होणें अपरिहार्य आहे.

---

## रोगांच्या निर्मूलनाचे जोरदार प्रयत्न

भारत सरकारच्या आरोग्यखात्यानें तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या कालांत हिंवतापाचें निर्मूलन करण्याची मोहीम यशस्वी करण्याचें ठरविलें आहे. ह्या कार्यक्रमांत जे रोग संसर्गजन्य आहेत, त्यांच्याविरुद्ध विशेष जोराचे उपाय करण्यांत येणार आहेत. त्याचप्रमाणें पिण्याच्या पाण्याचा पुरवठा व आरोग्याबद्दलचें शिक्षण ह्यांच्यावरहि भर देण्यांत येणार आहे. तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत लोकांच्या आरोग्याविषयीं जी योजना अमलांत आणावयाची आहे, तीबद्दल मध्यवर्ती सर-कारचें आरोग्यखातें व राज्य सरकारांचीं आरोग्यखातीं ह्यांच्यांत विचारविनिमय चालू आहे. दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत आरोग्यविषयक योजनांसाठीं २७० कोटी रुपये मंजूर करण्यांत आले होते. देशांतील प्रत्येक खेड्याला पिण्याचें पाणी मिळण्याची सोय करण्याचें दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत ठरविण्यांत आलें होतें. पण आतांपर्यंत १० ते १५ टक्के खेड्यांनाच अशी सोय उपलब्ध करून देण्यांत आली आहे. दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत चालू करण्यांत आलेली हिंवताप-विरोधी मोहिम अधिक नेटानें पुढें चालविण्यांत येणार आहे. देवी, कॉलरा, क्षय व महारोग ह्या रोगांच्या बाबतींत मात्र संपूर्ण उच्चाटनाचे प्रयत्न करणें शक्य होणार नाहीं. महारोगाच्या बाबतींत रोग्यांना इस्पितळांत ठेवण्याऐवजीं घरांतच वैद्यकीय देखरेखीखालीं उपचार करण्यावर जोर देण्यांत येणार आहे. ह्या बाबतींत कांहीं प्रमाणांत यश येऊं लागलें आहे. आतां पूर्वीपेक्षा अधिक महारोगी रोगावर उपचार करून घेण्यास पुढें येत आहेत. तथापि, महारोग झाल्याचें कबूल करण्याची वृत्ति लोकांत अजूनहि कमी आहे. त्यामुळें बरेच महारोगी अद्याप उघडपणें उपचार घेण्यास कचरतात.

---

## आयुर्विमा कॉर्पोरेशननें केलेली प्रगति

आयुर्विमा कॉर्पोरेशनचे अध्यक्ष श्री. गोपालकृष्णन् ह्यांनीं कॉर्पोरेशनच्या तिसऱ्या वार्षिक सभेच्या वेळीं बोलतांना ह्या धंद्याविषयीं पुढीलप्रमाणें माहिती दिली आहे. आयुर्विमा कॉर्पो-रेशनचा विमानिधि १९५७ सालीं ४१०·४१ कोटी रुपये होता तो आतां ४४७·८१ कोटी रुपये झाला आहे. १९५९ च्या पहिल्या आठ महिन्यांत कॉर्पोरेशननें १४८·१६ कोटी रुपयांचा नवा धंदा केला. गेल्या वर्षाच्या ह्याच काळाशीं तुलना करतां धंद्याची वाढ २३ टक्क्यांनीं झालेली दिसून येते. आयुर्विमा कॉर्पोरेशननें प्रगतीचा सध्यांचा वेगच चालू ठेवला तर कॉर्पो-रेशननें आखलेल्या पंचवार्षिक कार्यक्रमांपैकीं पहिल्या वर्षातील लक्ष्य गांठण्यास अडचण पडणार नाहीं. कार्यक्रमाच्या पहिल्या वर्षाचें लक्ष्य ४१५ कोटी रुपयांच्या नव्या धंद्याचें ठेवण्यांत आलें आहे. पं. वार्षिक कार्यक्रमाच्या शेवटच्या वर्षांत म्हणजे १९६३ सालीं १,००० कोटी रुपयांचा नवा धंदा मिळविण्याचा कॉर्पोरेशनचा बेत आहे. १९५७ सालीं कॉर्पोरेशननें ७·९५ लाख नव्या पॉलिसी दिल्या होत्या. त्यांची दर्शनी किंमत २८१·९० कोटी रुपये होती. १९५८ सालीं कॉर्पोरेशननें ९·३५लाख नव्या पॉलिसी दिल्या. त्यांची दर्शनी किंमत ३४३·०७ कोटी रुपये होती. १९५७ सालीं ५६·८३ लाख पॉलिसी चालू होत्या व त्यांची किंमत १,४७३ कोटी रुपये होती. १९५८ सालीं चालू असलेल्या एकूण पॉलिसींची संख्या ६२·३० लाख झाली व त्यांची दर्शनी किंमत १,६८१ कोटी रुपयांपर्यंत आली. एक सोडून बाकीच्या सर्व विभागांतून रद्द झालेल्या विमापत्रकांचे आंकडे आले, त्यावरून असें दिसतें कीं, १९५७ च्या मानानें १९५८ सालीं रद्द झालेल्या पॉलिसींचें प्रमाण कमी झालें आहे.

## परदेशीय चलनाच्या उधळपट्टीचा आरोप

कोचीन येथें इंडियन चेंबर ऑफ कॉमर्सपुढें बोलतांना श्री. ए. डी. श्रॉफ ह्यांनीं भारत सरकारच्या कांहीं मंत्र्यांवर परदेशीय चलनाची उधळपट्टी केल्याचा आरोप केला आहे. ह्या विषयासंबंधीं आपले विचार व्यक्त करतांना ते म्हणाले कीं, ज्या मंत्र्यांनीं ही उधळपट्टी केली त्यांची चौकशी करण्यांत आली पाहिजे. भारताला स्वातंत्र्य प्राप्त झाल्यापासून सरकारनें १,००० कोटी रुपयांचें परदेशीय चलन अन्नधान्याच्या आयातीवर खर्च केलें आहे. हा वारसा असा आहे कीं, त्याचा परिणाम म्हणून हिंदवासीयांना अजून अनेक वर्षे गुलामींत काढावीं लागणार आहेत. इतक्या मोठ्या प्रमाणावर अन्नधान्याची आयात करावी लागली ह्यावरून आपल्या अर्थव्यवस्थेची प्रकृति गंभीर होती हें स्पष्टच होतें. अन्नधान्याची ही टंचाई सरकारी धोरणाचाच परिणाम आहे. शेतीच्या विकासाला जितकें महत्त्व व प्राधान्य द्यावयास पाहिजे होतें तितकें सरकारनें दिलें नाहीं. आतां अन्नधान्याचा व्यापार सरकार आपल्याकडे घेणार आहे. पण शेतकऱ्यांपासून तो तहत किरकोळ व्यापाऱ्यांपर्यंत नियंत्रणाची सांखळी निर्माण केल्यावांचून हा प्रयोग कधींहि यशस्वी होणार नाहीं. मॅंगेनीझचा व्यापार सरकारनें हातीं घेतल्यापासून अमेरिका तिला लागणारें मॅंगेनीझ ब्राझीलकडून घेऊं लागली आहे. म्हणजे भारताला अमेरिकेच्या बाजारपेठेला मुकावें लागलें आहे. मॅंगेनीझच्या निर्यातीबद्दल भारत सरकारच्या बदलत्या धोरणाशीं मिळतें घेणें अमेरिकेंतील गिऱ्हाइकांना जमलें नाहीं. त्याचा परिणाम असा झाला कीं, मॅंगेनीझचा व्यापार सरकारनें हातांत घेतल्यापासून १२ महिन्यांच्या आंतच भारताची मॅंगेनीझची निर्यात ५० टक्क्यांनीं घटली.

## साक्षरता वाढली, पण कमावणाऱ्या व्यक्ति कमी झाल्या !

भारतांतील साक्षरतेच्या प्रमाणांत १०० टक्क्यांहून अधिक वाढ झाली आहे. १९५१ मध्यें साक्षरतेचें प्रमाण १६.६ टक्के होतें, तें आतां ४०.७ टक्क्यांवर गेलें असल्याचें १९६१ च्या शिरगणतीकरितां प्रश्नावलि तयार करण्यासाठी मर्यादित स्वरूपांत केलेल्या पाहणींत दिसून आलें.

पुरुषवर्गापेक्षा स्त्रीवर्गांत शिक्षणाचा अधिक प्रसार होत असल्याचें दिसून आलें. १९५१ मध्यें एकूण लोकसंख्येच्या ७.९ टक्के स्त्रिया साक्षर होत्या तर हें प्रमाण आतां जवळ जवळ चौपट वाढून २८.८ टक्क्यांवर गेलें आहे. पुरुषवर्गाच्या साक्षरतेचें प्रमाणहि २४.९ टक्क्यांवरून ५१.७ टक्क्यांवर गेलें आहे.

### कमावणाऱ्या व्यक्तींत घट !

कमाविणाऱ्या व्यक्तींच्या प्रमाणांत थोडीशी म्हणजे सुमारें ४ टक्क्यांनीं घट झाल्याचें या पाहाणीवरून समजतें. १९५१मध्यें हें प्रमाण ३९.९ टक्के होतें, तें आतां ३६ टक्क्यांवर आलें आहे.

चालू वर्षाच्या सुरुवातीला मुंबई, कलकत्ता, दिल्ली आणि मद्रास या भारतांतील चार मोठ्या शहरांसुद्धां भारतांतील सर्व राज्यांत ही पाहणी करण्यांत येऊन, त्यासाठी शहरी आणि ग्रामीण विभागांतील १५,१७७ घरें निवडण्यांत आलीं व ७७,९३३ व्यक्तींच्या मुलाखती घेण्यांत आल्या. यांमध्यें ३७,४९८ स्त्रिया होत्या.

## अशोक हॉटेलला नफा

अशोक हॉटेलच्या ऑक्टोबर, १९५८ ते मार्च, १९५९ या मुदतींतील ऑडिट न केलेल्या हिशेबावरून पाहतां, या हॉटेलला सुमारें ३ लक्ष रुपये नफा होईल असें दिसून आलें.

## दि सातारा जिल्हा को. लँड मॉर्गेज बँक लि., कराड–सांगली

चेअरमन : नीलकंठराव आण्णाप्पा कल्याणी

मॅनेजर : एस्. एस्. पुटाणी

३० जून, १९५९ अखेर संपलेल्या वर्षी वरील बँकेचें भाग भांडवल ४४,५८५ रु. नीं वाढून तें १,७९,२७० रु. झालें. १९५७–५८ सालापर्यंत कर्जमागणीचा आंकडा मर्यादितच होता. पण अहवालाच्या वर्षी ११ लक्ष रु. कर्जमागणीचे ५१६ अर्ज आले; त्यांत जमीन सुधारणा, विहीर, इंजिन इत्यादींसाठी मागणी मोठ्या प्रमाणावर आहे, हें सुचिन्ह आहे. अहवालाचे वर्षी १०½ लक्ष रु. चे ४९७ अर्ज तपासले जाऊन ३६३ समासदांना ६¾ लक्ष रु. कर्ज प्रत्यक्ष देण्यांत आलें. बँकेच्या कचेऱ्या कराड, सांगली येथें असून फलटण, इस्लामपूर व तासगांव येथें शाखा उघडण्यांत आल्या आहेत. सातारा शाखाहि लवकरच सुरू होईल. विहीर–तगाईचें काम बँकेकडे सरकारनें सोंपविल्यामुळें तिच्या कार्यक्षेत्रांत वाढ झाली आहे. अहवालाचे वर्षी बँकेस ९,५२२ रु. नफा झाला. मुंबई राज्यांतील लँड मॉर्गेज बँकांच्या कार्याच्या प्रगतीसाठी सातारा जिल्हा को. लँड मॉर्गेज बँकेचे चेअरमन सतत प्रयत्न करीत आले आहेत; त्याबाबत सरकारकडे व संबंधित अधिकार–मंडळाकडे ते योग्य सूचना करीत असतात व त्या बँकांच्या कार्यात नवचैतन्य यावें अशी खटपट करीत असतात. त्यामुळें, ह्या लँड मॉर्गेज बँकेस मुंबई राज्यांत मानाचें स्थान प्राप्त झालें आहे; इतर लँड मॉर्गेज बँकांनाहि त्याचा फायदा मिळणार आहे.

## पुणें सें. को. बँकेच्या बोर्डाची रचना

येथील पुणें सेंट्रल को–ऑप. बँकेची विशेष साधारण सभा बँकेचे अध्यक्ष श्री. य. बा. सावंत इनामदार यांचे अध्यक्षतेखाली दिनांक २४-९-५९ रोजीं गोखले हॉलमध्यें झाली. दिनांक १-३-५९ च्या बँकेच्या विशेष साधारण सभेमध्यें वैयक्तिक प्रतिनिधींची संख्या ७ ऐवजीं २ करण्यांत आली होती. ही संख्या २ ची ६ करावी व पुणें जिल्हा सह. ख. वि. संघाला १ प्रतिनिधि द्यावा व शेतकी सोसायट्यांना १० ऐवजीं ११ प्रतिनिधि द्यावेत अशा अर्थाची दुरुस्ती या सभेपुढें होती. ती एकमतानें मंजूर झाली. शिवाय जिल्ह्यांतील तालुका सह. ख. वि. सं. तर्फे १ व सहकारी साखर कारखान्यांतर्फे १ असे २ जादा प्रतिनिधि संचालकमंडळावर असावेत असेंहि सभेनें एकमतानें ठरविलें. यामुळें बँकेच्या संचालकमंडळाची रचना आतां खालीलप्रमाणें झाली आहे. शेतकी सोसायट्यांचे ११ बिगर शेतकी सोसायट्यांचे २, जिल्हा खरेदी-विक्री संघाचा १, तालुका खरेदी-विक्री संघाचा १, सहकारी साखर कारखान्यांचा १, असे एकूण १६ प्रतिनिधि सहकारी संस्थांचे राहतील. पुणें शहर तालुक्यांतून ५ व उरलेल्या जिल्ह्यांतून १, असे ६ प्रतिनिधि वैयक्तिक समासदांचे राहतील. याखेरीज मुंबई राज्य सहकारी बँकेतर्फे १, मुंबई राज्य सरकारचे ३ व कार्यकारी संचालक मिळून एकूण २७ जणांचें संचालकमंडळ या सभेंत निश्चित झालें.

## राज्य सरकारांच्या योजनांस मध्यवर्ती सरकारचें साह्य

निरनिराळ्या राज्य सरकारांच्या पंचवार्षिक योजनांस मध्यवर्ती सरकारनें साह्य देण्यासाठी १९५८ मध्यें अवलंबिण्यांत आलेली पद्धत या वर्षीतहि तशीच पुढें चालू ठेवण्यांत येईल.

महात्मा गांधी जयंति निमित्तानें

## गोखले ह्यांना दिसलेले महात्मा गांधी

( इंडियन नॅशनल काँग्रेस, लाहोर, १९०९ )

प्रतिनिधि बांधवांनो, ह्या संबंधांत श्री. गांधी ह्यांनीं केलेल्या अलौकिक कामगिरीनंतर, कोणत्याहि हिंदवासीयाला, कधींहि, येथें किंवा हिंदवासीयांच्या कुठल्याहि समुदायांत त्या विभूतीचें नांव भावनावश झाल्याविना आणि अभिमानाचें भरतें आल्याखेरीज उच्चारतां येणें केवळ अशक्य आहे. सद्गृहस्थहो, गांधींचा व माझा निकट परिचय असणें हें मी माझें सद्भाग्य समजतों; त्यांच्यापेक्षा अधिक निर्मल, उदात्त, शूर आणि महामनस्क आत्मा ह्या पृथ्वीतलावर ह्यापूर्वी कधींच अवतरलेला नाहीं, ह्यापेक्षा मी त्यांचें अधिक काय वर्णन करूं? तपस्वी जीवन जगणारे, आपल्या बांधवांशीं प्रेमाच्या अत्युच्च तत्त्वांनीं निगडित झालेले, सत्य आणि न्यायशीलता ह्यांवर दृढ भक्ति असलेले सत्पुरुष आपल्या नुसत्या दृष्टिक्षेपानेंहि अभागी बांधवांत जणू जादूप्रमाणें नवी दृष्टि निर्माण करीत असतात; अशा क्वचित् आढळणाऱ्या महाभागांत गांधींची गणना होते. सत्पुरुषांतला सत्पुरुष, वीरांतला वीर, देशभक्तांतला देशभक्त, असेंच त्यांचें वर्णन करतां येईल. प्रस्तुत काळांत, हिंदी मनुष्यत्वानें त्यांच्या अवतारांत अत्युच्च पातळी गांठली आहे, असें विश्वासपूर्वक म्हणतां येईल.

## Mahatma Gandhi

**As Gokhale Saw Him**

( *I. N. Congress, Lahore, 1909* ).

**Fellow Delegates**, after the immortal part which Mr. Gandhi has played in this affair, I must say it will not be possible for any Indian, at any time, here or in any other assembly of Indians, to mention his name without deep emotion and pride. Gentlemen, it is one of the previleges of my life that I know Mr. Gandhi intimately and I can tell you that a purer, a nobler, a braver and a more exalted spirit has never moved on this earth. Mr. Gandhi is one of those men, who living an austerely simple life themselves and devoted to all the highest principles of love to their fellow being and to truth and justice, touch the eyes of the weakest brethren as with magic and give them a new vision. He is a man who may be well described as a man among men, a hero among heroes, a patriot among patriots, and we may well say that in him Indian humanity at the present time has reached its highest watermark.

## " आज प्रवास करा; भाडें सावकाशीनें द्या "

एअर-इंडिया इंटरनॅशनलची वरील योजना २ ऑक्टोबर, १९५९ पासून अंमलांत येणार आहे. मध्यमवर्गीय लोक आणि विद्यार्थी ह्यांच्या सोईसाठी प्रस्तुत योजना आखण्यांत आली आहे. ह्या योजनेप्रमाणें, विमानाच्या भाड्यापैकी २०% रक्कम उतारूनें रोख द्यावयाची आहे. बाकीची ८०% रक्कम बँक ऑफ इंडिया त्याला कर्जाऊ देईल व ती रक्कम एअर-इंडिया इंटरनॅशनलला मिळेल. बँक ऑफ इंडिया उतारूच्या आर्थिक परिस्थितीची चौकशी केल्यावरच कर्ज मंजूर करील, हें उघड आहे. बँक कर्जावर दरमहा एक टक्का दरानें व्याज आकारील, आणि कर्जाची रक्कम १५ हप्त्यांत फेडावी लागेल. एअर-इंडियाचीं विमानें ज्या ज्या मार्गांनीं जातात, त्या त्या मार्गांची तिकिटें ह्या सवलतीच्या पद्धतीनें मिळूं शकतील, आणि जेथें जेथें बँक ऑफ इंडियाच्या कचेऱ्या आहेत, तेथें तेथें योजना अंमलांत येईल. कर्जासाठीं अर्ज एअर-इंडियामार्फत आणि इंटरनॅशनल एअर ट्रॅन्स्पोर्ट असोसिएशननें मंजुरी दिलेल्या ट्रॅव्हल एजंटामार्फत पाठवितां येतील. ह्या योजनेचा फायदा घेण्यास पुरेसे लोक पुढें येतील अशी अपेक्षा आहे.

विमानानें परदेशीं जाण्याची अशी सोय झाली, तरी सुटीखातर जाणाऱ्या उतारूला आपल्याबरोबर ७५ रुपयांपेक्षा जास्त रक्कम नेतां येत नाहीं. म्हणजे चार आंकडी रक्कम प्रवासासाठी खर्चावयाची पण चार दिवस पुरतील एवढे पैसेहि बरोबर घ्यावयाची परवानगी नसावयाची, असें होणार. परदेशी हुंडणावळीची चणचण असतांनाहि शेंकडों लोक परदेशांत चैन करून येऊं शकतात असें आज आढळतें. त्याचा अर्थ परदेशांत बेकायदा मार्गानें ते रक्कम उपलब्ध करून घेत असले पाहिजेत, हें उघड आहे. तेव्हां, प्रवासाला उत्तेजन देतांना परदेशांतील खर्चावरील बंधनें थोडीं सैल करणें आवश्यक ठरेल.

## मुद्रित-शोधक मंडळाची कामगिरी

मुद्रित-शोधक मंडळ, पुणें, ह्या संस्थेनें १५ जून, १९५९ ते १५ सप्टेंबर, १९५९ अखेर चालविलेल्या मुद्रित-शोधन वर्गांचा प्रशस्ति-पत्र-वितरण समारंभ मुंबई राज्याचे विद्याधिकारी, डॉ. ए. जी. पवार, यांच्या हस्तें 'मुद्रक-भवन'मध्यें दि. २३ सप्टेंबर रोजीं झाला. मुद्रण व्यवसायांत मुद्रित शोधकाचा फार महत्त्वाचा वाटा समजला जातो, परंतु मुद्रित-शोधकांना जें वेतन मिळतें तें इतर व्यावसायिकांपेक्षा अत्यल्प असल्यानें लायक लोक ह्या व्यवसायाकडे आकृष्ट होत नाहींत. जे व्यवसायांत येतात, त्यांच्या शिक्षणाची सोय उपलब्ध नाहीं. मुख्यत: व्यावसायिक कसोटी, प्रतिष्ठा व स्थैर्य वाढविण्याचें सांस्कृतिक स्वरूपाचें कार्य करण्यासाठी आणि गुण वाढवून नंतरच जास्त वेतनाची अपेक्षा निर्माण करण्याची निष्ठा बाळगून मुद्रित-शोधक मंडळाची स्थापना व्यावसायिकांनीं केली आहे. मंडळाची स्थापना १९५६ मध्यें झाली. गेल्या तीन वर्षांत मंडळानें केलेल्या भरीव कामगिरीचा परिचय मंडळाच्या अहवालांत देण्यांत आला आहे. मंडळानें मुद्रित-शोधन वर्गाची योजना करून एक अभ्यासक्रम तयार केला आणि त्या अभ्यासक्रमाप्रमाणें वर्ग चालविला. वर्गांचा फायदा २५ विद्यार्थ्यांनीं घेतला. त्यांना सामान्य ज्ञानहि प्राप्त व्हावें, ह्या व्यवसायांतील प्रथितयश विद्वानांचे अनुभव त्यांना कळावे आणि मुद्रित-शोधकाकडून त्यांच्या अपेक्षा काय आहेत हेंहि लक्षांत यावें, ह्या दृष्टीनें अशा विद्वानांची एक व्याख्यानमालाहि योजण्यांत आली. मुद्रित-शोधकांची ही संघटना स्वार्थत्यागपूर्वक आणि निश्चयानें आपलें अंगीकृत कार्य करीत आहे. त्याचा फायदा लेखक, संपादक, मुद्रक, प्रकाशक व सामान्य वाचक ह्या सर्वांसच होणार असल्यानें, त्याला सरकारचा व हितसंबंधी लोकांचा भरीव पाठिंबा मिळणें अगत्याचें आहे. अशा मदतीची पात्रता मुद्रित-शोधक मंडळानें प्रत्यक्ष कृतीनें सिद्ध केली आहे.

## रिझर्व्ह बँकेचें नफा–तोटा पत्रक

गेल्या तीन वर्षांचे तुलनात्मक आंकडे : मध्यवर्ती सरकारला ४० कोटी रु. प्राप्ति

| | वर्षअखेर | | |
|---|---|---|---|
| | ३०–६–१९५९ | ३०–६–१९५८ | ३०–६–१९५७ |
| **उत्पन्न** | रु. | रु. | रु. |
| व्याज, डिस्कौंट, एक्सचेंज, कमिशन, इ० ... | ४७,२५,६०.४७८ | ३७,०८,८८,०५४ | ३६,२०,५३.२४५ |
| **खर्च** | | | |
| पगार, इ० ... | ३,७८,०९,३८६ | ३,४२,६०,१८२ | ३,१८,६१,१२४ |
| डायरेक्टर व लोकलबोर्ड सभासदांची फी व खर्च ... | ७०,५१९ | ८५,६५३ | ८०,३६३ |
| ऑडिटरांची फी ... | २२,५०० | २२,५०० | २२,५०० |
| भाडें, कर, विमा, दिवाबत्ती इ० ... | १९,२९,८०८ | १६,७१,८१७ | १६,६२,४७६ |
| कायदाविषयक खर्च ... | १,०९,२२९ | १८,५७५ | ३०,३७२ |
| पोस्ट व तार खर्च ... | ३,२४,११७ | ३,१२,८७१ | २,५८,९१५ |
| पैशाचा रेमिटन्स ... | ४६,२४,१२२ | २९,९५,३७९ | २६,२४,४६६ |
| स्टेशनरी, इ० ... | ८,१२,०७२ | ७,४२,६१६ | ५,९६,२६३ |
| चेक–नोटांची छपाई ... | १,१४,९८,४०८ | १,२४,१५,१०० | १,३८,५२,२१४ |
| घसारा, दुरुस्ती ... | २३,६३,३९३ | २३,४५,९७८ | २५,३०,१७६ |
| एजन्सी चार्जेस ... | १,००,२८,०८८ | १,३७,३२,८५१ | ६६,०८,८५८ |
| स्टाफ फंडाला वर्गणी ... | ४,६३,००० | २९,००० | ३६,००० |
| किरकोळ खर्च ... | २४,८३,१११ | २२,४६,२७१ | १८,७५,६४४ |
| मध्यवर्ती सरकारला देण्यासाठी उपलब्ध वाढावा ... | ४०,००,२२,७२१ | ३०,००,०९,२५४ | ३०,००,१३,८७० |
| एकूण ... | ४७,२५,६०,४७८ | ३७,०८,८८,०५४ | ३६,२०,५३,२४५ |


# भोर स्टेट बँक लि.

[ स्थापना : १९४४ ]

## मुख्य कचेरी:–भोर, जि. पुणें.

शाखाः–पुणें, पाली व शिरवळ.

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. ५,००,००० |
| खपलेलें भांडवल | रु. ५,००,००० |
| वसूल भांडवल | रु. २,५०,००० |
| गंगाजळी व इतर फंडस् | रु. ९१,००० |

## बोर्ड ऑफ डायरेक्टर्स

श्री. म. व्यं. शिंगरे, अध्यक्ष.
न. भू. ना. पां. थोपटे, उपाध्यक्ष.
रावसाहेब य. द. खोले.
श्री. चं. रा. राठी.
श्री. गो. वा. देवी
श्री. बा. ग. चंदुके.

सरकारी रोखे खरेदी–विक्री, व्याजवसुली, पेन्शन कलेक्शन व बँकिंगचे इतर सर्व व्यवहार केले जातात.

बँक १ ते ४ वर्षे मुदतीसाठी कायम ठेवी स्वीकारते. दराबाबत समक्ष चौकशी करावी.

पुणें कचेरी:–बुधवार घ. नं. ३६१–६२, पासोड्या विठोबानजीक. फोन नं. २५७६.

अधिक माहितीसाठी लिहा.

एस्. ए. कुलकर्णी
मॅनेजर.

# दी भारत इंडस्ट्रिअल बँक लिमिटेड

हेड ऑफिस : पुणें शहर

— शाखा —

(१) पुणें लष्कर (२) बारामती (३) लोणावळा (४) श्रीरामपूर (५) ओझर (जि. नाशिक) (६) खोपोली (जि. कुलाबा).

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. १५,४३,८१० |
| विक्री झालेलें भांडवल | रु. ७,९३,८१० |
| वसूल भांडवल | रु. ४,००,१९५ |
| रिझर्व्हज् | रु. १,३८,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. ८५,००,०००चे वर |

★रिकरिंग डिपॉझिट्स स्वीकारलीं जातात.
★शॉर्ट टर्म्स व कॉल डिपॉझिट्स स्वीकारलीं जातात.
★मुख्य कचेरींत माफक भाड्यांत सेफ डिपॉझिट लॉकर्स मिळतात.

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

रा. बा. साळवेकर
B. A., LL. B.
मॅनेजर

## भारतांतील वृत्तपत्रांच्या संख्येंत व खपांत वाढ

### मालकीचें स्वरूप

पत्रांच्या मालकीचें स्वरूप पाहतां याच्या मागील वर्षाप्रमाणेंच सदर वर्षातहि वैयक्तिक मालकीचींच पत्रें अधिक होतीं. १९५८ मध्यें एकूण पत्रांपैकी ४४·३ टक्के पत्रें वैयक्तिक मालकीचीं होतीं. १९५७ मधील हाच आंकडा ४३·८ टक्के होता. त्याखालोखाल धार्मिक व सहकारी संस्था धरून, सोसायट्या वा असोसिएशनच्या मालकीच्या पत्रांचा क्रम लागतो. अशीं पत्रें १९५८ मध्यें २२·६ टक्के होतीं. १९५७ मध्यें हेंच प्रमाण २०·९ टक्के होतें. पब्लिक व प्रायव्हेट कंपन्यांच्या मालकीचीं पत्रें १९५७ व १९५८ मध्यें ८·१ टक्के होतीं. १९५८ व १९५७ मधील फर्मेच्या भागीदारींतील पत्रांची संख्या अनुक्रमें ७·७ व ८·२ टक्के तर सरकारी ( मध्यवर्ती व राज्यसरकारचीं ) प्रकाशनांची संख्या अनुक्रमें ४·८ व ५·५ टक्के होती.

### एकच मालकी

एकाहून अधिक पत्रांची समान मालकी असणाऱ्या पत्रांची वर्गवारी या अहवालांत सांखळी-पत्रें, गट पत्रें व अनेकावृत्ति ( अनेक केंद्रांतून निघणारीं ) पत्रें या तीन वर्गांत करण्यांत आलेली आहे.

या तीन वर्गांत मोडणाऱ्या पत्रांची संख्या १९५७ मध्यें साखळी-पत्रें ६३, गटपत्रें ३१६ व अनेकावृत्ति पत्रें ६०, अशी होती. ( कांहीं अनेकावृत्ति पत्रांची मालकी सांखळी पत्रांकडे होती. ) त्यांचा एकूण खप पुढीलप्रमाणें होता :—सांखळी-पत्रें १८·६७ लक्ष ( एकूणाच्या १७ टक्के ), गटपत्रें २२·२० लक्ष ( एकूणाच्या २० टक्के ), अनेकावृत्ति पत्रें ११·१८ लक्ष ( एकूणाच्या ९ टक्के ).

वृत्तपत्रांच्या सांखळयांच्या व गटांच्या संख्येंत वाढ झाली असल्याचें या अहवालांत म्हटलें आहे. अनेकावृत्ति पत्रसंस्थांची संख्या मात्र आहे तीच राहिली. १९५७ मध्यें त्यांची संख्या अनुक्रमें ९, ११९ व २३ होती, तर ती १९५८ मध्यें अनुक्रमें १२, १२३ व २३ अशी झाली. सदर वर्षांत दोन सांखळ्या बंद पडल्या. तर पांच नवीन सांखळ्या सुरू झाल्या. त्यांपैकी अशा सांखळ्या कांहीं गट व अनेकावृत्ति पत्रांचें रूपांतर सांखळ्यांत झाल्यानें स्थापन झाल्या. एका प्रकरणीं, कांहीं विशिष्ट पत्रांच्या मालकीसंबंधीची निश्चित माहिती मिळाल्यानें ती सांखळींतील पत्रें होत असें समजून आलें.

सन १९५८ मध्यें सांखळ्या, गट व अनेकावृत्ति पत्रांच्या संस्था यांच्या नियंत्रणाखालीं अनुक्रमें ८१, ३४४ व ६२ पत्रें चालू होतीं. प्रकाशकांकडून माहिती मिळालेल्या पत्रांचा विचार करतां, त्यांचा खप व त्या खपाचें भारतांतील पत्रांच्या एकूण खपाशीं शेंकडा प्रमाण पुढीलप्रमाणें होतें:—सांखळ्या-२१·११ लक्ष ( १४·६ टक्के ), गट-२९·८७ लक्ष ( २०·७ टक्के ) व अनेकावृत्ति पत्रांच्या संस्था-१३·०९ लक्ष ( ९·७ टक्के ).

अशा रीतीनें सांखळ्या, गट व अनेकावृत्ति पत्रसंस्था यांच्या नियंत्रणाखालील पत्रांच्या खपांत वाढ झाली. यास अंशत: देशांत वृत्तपत्रांच्या वाचकवर्गांत झालेली वाढ व अंशतः या वर्गांतील पत्रांच्या संख्येंत झालेली वाढ कारणीभूत आहे. वृत्तपत्रांचा एकूण खप वाढल्यानें, सर्व पत्रांच्या एकूण खपाशीं असलेल्या या तीन वर्गांतील पत्रांच्या खपाच्या शेंकडा प्रमाणांत घट झाली.

### वृत्तपत्रांची आंकडेवारी

भारतांत प्रकाशित होणाऱ्या वृत्तपत्रांची संख्या ३१ डिसेंबर, १९५८ रोजीं ६,९१८ होती. ३१ डिसेंबर, १९५७ रोजीं ती ५,९३२ होती. १९५८ मध्यें १,०६२ नवीं वृत्तपत्रें निघालीं तर १९२ चालू पत्रें बंद पडलीं. म्हणजे सदर वर्षांत निव्वळ वाढ ८७० नें झाली. तसेंच पूर्वीपासून चालू असलेल्या ११६ पत्रांच्या बाबतींत सदर वर्षांत निरनिराळ्या ठिकाणांहून प्रेस रजिस्ट्रार कडे माहिती मिळाली. अशा रीतीनें १९५७ मधल्यापेक्षा १९५८ मध्यें वृत्तपत्रांची संख्या ९८६ नीं वाढली.

### राज्यनिहाय आंकडेवारी

सर्वांत अधिक वृत्तपत्रें पूर्वीप्रमाणेंच इंग्रजींतच ( २०·१ टक्के ) प्रकाशित झालीं. त्यानंतर हिंदी ( १८·३ ), उर्दू ( ८·२ ), बंगाली ( ७·१ ), गुजराती ( ६·६ ) व मराठी ( ५·४ ) असा टक्केवारीचा क्रम लागतो. इतर भाषांतून निघणारीं वृत्तपत्रें एकूणाच्या ५ टक्क्यांहून कमी होतीं. तथापि द्वैभाषिक व अनेकभाषिक पत्रांचें प्रमाण अनुक्रमें ९·८ व ६·१ टक्के होतें. मुंबई, दिल्ली, पश्चिम बंगाल या राज्यांत अनुक्रमें ३१२, २९७ व २७१ इंग्रजी पत्रें आहेत, तर राजस्थान व मध्यप्रदेशांत तीं अनुक्रमें अवघीं ५ व ८ आहेत. ओरिसा राज्य व मणिपूर व त्रिपुरा हे केंद्रशासित प्रदेश वगळून इतर सर्व राज्यांत हिंदी पत्रें प्रकाशित होतात. सर्वांत जास्त म्हणजे ४७९ हिंदी पत्रें उत्तर प्रदेशांत प्रकाशित होतात. त्याखालोखाल मध्यप्रदेश ( १६८ ), राजस्थान ( १३४ ) व दिल्ली ( १३१ ) यांचा क्रम लागतो. उर्दू पत्रें मुख्यत्वें पंजाब ( १४४ ), दिल्ली ( १३५ ), उत्तरप्रदेश ( १३१ ), मुंबई ( ४५ ) व आंध्र प्रदेश ( ४१ ) या राज्यांत निघतात.

निरनिराळ्या भाषांत मिळून ४६५ दैनिकें निघतात. नियतकालिकांत मासिकांची संख्या सर्वांत जास्त म्हणजे २,८०७ असून त्याखालोखाल साप्ताहिकांचा ( १,७५४ ) क्रम लागतो. पाक्षिकें ५९१ व त्रैमासिकें ४९१ असून इतर नियतकालिकांची संख्या ७४५ आहे.

सन १९५८ मध्यें सुरू झालेल्या १,०६२ पत्रांपैकी सर्वांत जास्त म्हणजे २७० पत्रें मुंबई राज्यांत निघालीं. पश्चिम बंगाल व दिल्ली या राज्यांत अनुक्रमें १३८ व १३४ पत्रें सुरू झालीं.

निरनिराळ्या भाषांत निघालेल्या नव्या वृत्तपत्रांपैकीं सर्वांत जास्त पत्रें इंग्रजींत ( २०५ ), निघालीं. त्यानंतर हिंदी ( १८३ ), उर्दू ( १०१ ), गुजराती ( ७३ ) व बंगाली ( ६९ ) यांचा क्रम लागतो. संस्कृत भाषेंत दोन नवीं पत्रें निघाल्यानें त्या भाषेंत आतां एकूण १० वृत्तपत्रें झालीं आहेत. सदर वर्षांत आसामी भाषेंत एकहि वृत्तपत्र निघालें नाहीं.

बंद पडलेल्या वृत्तपत्रांचें विश्लेषण करतां सर्वांत जास्त म्हणजे ४५ हिंदी भाषिक पत्रें बंद पडलीं. त्याखालोखाल उर्दू ३७ व इंग्रजी ३४ असा क्रम आहे. फक्त एक आसामी पत्र बंद झालें. सदर वर्षांत संस्कृत किंवा मल्याळम् पत्र एकहि बंद झालेलें नाहीं.

### वृत्तपत्रांचें वर्गीकरण

बाजारविषयक वार्तापत्रें, कादंबरी-माला, शालेय नियतकालिकें इत्यादिसारखीं कांहीं विशिष्ट नियतकालिकें यांची गणना, काटेकोरपणें पाहतां, वृत्तपत्रें या सदरांत करावी किंवा कसें यावर प्रेस रजिस्ट्रार गेलीं कांहीं वर्षें विचार करीत होते.

अशा सर्व प्रकाशनांची नोंद प्रेस रजिस्ट्रारांनीं करावी, परंतु त्यांची संख्या अहवालांत वेगळी दाखविण्यांत यावी व कॅटलॉगमध्यें बाजारविषयक वार्तापत्रें, कंपन्यांचीं मासिकें, कादंबरीमाला, शालेय मासिकें इ. वर्गीकरण त्यांच्या नांवासमोर लिहिण्यांत यावें अशा या बाबतींत निर्णय घेण्यांत आला आहे. १९५८ च्या अहवालांत तसें दाखविण्यांत आलें असून त्यांची देशांतील, तसेंच राज्यनिहाय संख्या दिलेली आहे.

या आधारें पाहतां काटेकोरपणें वृत्तपत्रें नसलेलीं १,२९८ नियतकालिकें होतीं. देशांत प्रसिद्ध होणाऱ्या ४६५ दैनिकांपैकीं ६१ बाजारविषयक वार्तापत्रें, सायक्लोस्टाइल्ड वार्तापत्रें, हवामानविषयक बातमीपत्रें इ. होतीं. सदर अहवालांत अशा सर्व दैनिकांची यादी दिलेली असून जीं काटेकोरपणें वृत्तपत्रें नाहींत त्यांचा तसा निर्देश केलेला आहे.

### वृत्तपत्रांचा कॅटलॉग

या अहवालांत मागील वर्षाप्रमाणेंच प्रत्येक राज्यांतील वृत्तपत्रांचा कॅटलॉग दिलेला आहे. प्रत्येक वृत्तपत्राचा स्थापना दिनांक त्यापुढेंच दिलेला आहे, हें या वर्षीच्या कॅटलॉगचें एक वैशिष्ट्य सांगतां येईल. तसेंच वृत्तपत्रांतील मजकुरावरून केलेलें त्यांचें वर्गीकरण देखील दिलेलें आहे.

### राणीनें बेबीसाठीं विणायला घातलें

एलिझाबेथ राणीनें आपल्या अपेक्षित बेबीसाठीं विणायला घातलें आहे. राजघराण्यांतील नूतन बेबीच्या कपड्यांचें सर्वत्र अनुकरण केलें जातें आणि अमेरिकेंतील मातासुद्धां आपल्या अपत्यांना त्याप्रमाणेंच कपडे करूं लागतात. साहाजिकच, लक्षावधि डॉलर्सच्या कपड्यांची ग्रेट ब्रिटनमधून निर्गत होते; तेवढ्या डॉलर्सची कमाई होते. हजारों लोक राजघराण्यांतील नव्या बेबीसाठीं मोठ्या आपुलकीनें कपडे विणून राणीकडे पाठवितात. राणी मग हे कपडे इस्पितळांना व अर्भकालयांना वाटून टाकते; पण त्यापूर्वी कपडे पाठविणारांना आभारपूर्वक पोंच दिली जाते. प्रिन्स ऑफ वेल्स जन्मल्यावर राणीकडे भेटीदाखल आलेले, विणलेले कपडे अशा रीतीनें वाटण्यांत आले, ते वाहून नेण्यासाठीं सहा लॉऱ्या लागल्या !

### फाऊंटन पेनांचें उत्पादन

भारतांत सध्यां फाऊंटन पेनें तयार करणारे कारखाने पुष्कळ असल्यानें त्यांत आणखी भर घालण्यानें फाऊंटन पेनांच्या दर्जांत सुधारणा होण्याची शक्यता कमी होईल आणि म्हणून याबाबतच्या परिस्थितीचा फेरविचार केल्याशिवाय भविष्यकाळांत असे कारखाने काढण्याच्या सूचनांचा विचार न करण्याचें सरकारनें ठरविलें आहे. तथापि लहान कारखान्यांची मोठ्या कारखान्यांत वाढ करण्याच्या सूचनांचें स्वागत केलें जाईल.

### सार्वजनिक बांधकामासाठीं बिल्डिंग कन्स्ट्रक्शन कॉर्पोरेशन

सार्वजनिक बांधकामासाठीं बिल्डिंग कन्स्ट्रक्शन कॉर्पोरेशन स्थापन करण्याचा निर्णय लवकरच घेण्यांत येईल. हें कॉर्पोरेशन इतर कोणत्याहि कंत्राटदाराप्रमाणें काम करील. कंत्राट कामाचे दर खालीं आणण्यास व कामाचा दर्जा सुधारण्यास या कॉर्पोरेशनचा उपयोग होईल अशी आशा आहे.


## दि बँक ऑफ महाराष्ट्र लि.

स्थापना १९३५ : शेड्यूल्ड बँक

संचालक मंडळ :

श्री. वा. पुं. वर्दे ( अध्यक्ष ) श्री. न. ग. पवार ( उपाध्यक्ष )
श्री. घों. कृ. साठे श्री. फ. दो. पदमजी
श्री. मा. वी. शहा श्री. मा. म. गुते
श्री. म. वा. जांभेकर श्री. म. स. पारखे
श्री. वि. सी. शिरगांवकर श्री. ज. के. रेगे
श्री. र. भि. वांठिया

विशाल महाराष्ट्र व लगतच्या मुलखांत बँकेच्या ४९ शाखा असल्यानें या प्रदेशांतील जनतेला खाजगी व व्यापारी व्यवहारासाठीं महाराष्ट्र बँकेशीं संबंध जोडणें सोयीचें व फार फायद्याचें ठरतें.

पोतदार हॉस्पिटल समोर वरळी ( मुंबई १८ ) येथे दि. १४ सप्टेंबर रोजीं बँकेची नवीन शाखा सुरू झाली असून अकलूज व बार्शी येथेंहि लवकरच शाखा सुरू होतील.

मुख्य कचेरी थोरले बाजीराव रस्ता, पुणें २. चिं. वि. जोग, मॅनेजर.

## बँक ऑफ पूना, लिमिटेड

( शेड्यूल्ड बँक )

अधिकृत भांडवल ... रु. ५०,००,०००
विक्रीस काढलेलें व खपलेलें भांडवल रु. २५,००,०००
वसूल भांडवल ... रु. १२,५०,०००

—: संचालक मंडळ :—

१. श्री. दत्तात्रय रामचंद्र नाईक, चेअरमन
२. डॉ. ना. भि. परुळेकर, व्हाईस चेअरमन ( संचालक, सकाळ )
३. श्री. फ्रामजी पी. पोचा
४. श्री. गणपतराव काळुराम नाईक, B. Sc., B. E., LL. B.

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

अल्प मुदत ठेवीवर आकर्षक व्याज.

...शाखा...

पुणें (१) सदाशिव पेठ, (२) डेक्कन जिमखाना (३) सांगली.

हेड ऑफिस व सांगली शाखेंत अल्प भाड्यांत लॉकरची सोय.

मुख्य ऑफिस : ४५५ रविवार पेठ, पुणें गो. गं. साठे मॅनेजर


हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर ( पो. ऑ. डेक्कन जिमखाना ) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.